

मूल्यवर्धन

# मीच माझ्या शाळेचा भाग्यविधाता -शिक्षक

माहितीपत्रक

# मूल्यवर्धन जिल्हा मेळावे

जानेवारी ते मार्च २०२०

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
महाराष्ट्र, पुणे

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

★ **मेळाव्यांचे संयोजन :** शालेय शिक्षण विभाग-राज्य शासन व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

★ **जिल्हास्तरीय मेळावा :** महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्ह्याच्या ठिकाणी मेळाव्याचे आयोजन

★ **मेळाव्यामध्ये संभाव्य उपस्थिती :** त्या त्या जिल्ह्यातील निवडक शिक्षक, प्रेरक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), प्राचार्य DIET (District Institute Of Education And Training)

★ **पोस्टर्सचे भव्य प्रदर्शन :** स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.) शिक्षक व विद्यार्थ्यांनी मूल्यवर्धनवर आधारित तयार केलेली पोस्टर्स

**मेळाव्यांची उद्दिष्टे :**

१. मूल्यवर्धन कार्यक्रमातील आतापर्यंतच्या यशस्वी अनुभवांचा मागोवा घेणे.

२. स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.) चे शिक्षक, प्रेरक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शाळा निरीक्षक (म.न.पा.), विस्तार अधिकारी, तालुका नोडल अधिकारी, URC समन्वयक, गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (म.न.पा.), जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा नोडल अधिकारी, साधन व्यक्ती, अधिव्याख्याता, जेष्ठ अधिव्याख्याता, प्राचार्य (DIET) यांनी केलेले अथक परिश्रम व त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये होत असलेले सकारात्मक परिवर्तन याची दखल राज्य शासन व एसएमएफच्या माध्यमाने घेणे.

३. शिक्षकांनी केलेली मेहनत, बनविलेली पोस्टर्स, व्हिडिओज, अनुभव कथन या सर्व महत्त्वाच्या बाबी सर्वसामान्य जनतेसमोर ठेवणे.

४. शिक्षक व प्रशासकीय यंत्रणा यांच्या मार्फत मूल्यवर्धनच्या अंमलबजावणीत सातत्य राखून चळवळीत रूपांतर करण्याचा निर्धार करणे.

५. केंद्र शासनाच्या मानव संसाधन मंत्रालयाच्या माध्यमाने प्रत्येक राज्याकडून Performance Grading Index (PGI) भरून द्यावा लागतो. महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.)च्या शाळांमध्ये मूल्यवर्धनसह इतरही अनेक चांगले प्रयोग व कामे सुरू आहेत. मूल्यवर्धनसंदर्भात शाळाभेटी, वर्गनिरीक्षण, पोस्टर्स बनविणे, अनुभव लेख लिहिणे, महत्त्वाचे राष्ट्रीय दिवस साजरे करणे, निबंध स्पर्धा घेणे, ECO क्लब बनविणे, युथ क्लब बनविणे, यशोगाथा सादर करणे अशा अनेक गोष्टी केल्या जातात. या सर्व गोष्टी पुराव्या व रिपोर्टसह योग्य पद्धतीने PGI मध्ये भरणे. जेणेकरून संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य प्राथमिक शालेय शिक्षणात सर्वप्रथम कसे येईल यासाठीचे प्रयत्न करणे.

**मूल्यवर्धन प्रदर्शन :**

यावर्षी मूल्यवर्धन कार्यक्रम महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.)च्या सर्व ६७,००० शाळांपर्यंत पोहोचला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा) चे शिक्षक, प्रेरक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शाळा निरीक्षक (म.न.पा), विस्तार अधिकारी, जिल्हा नोडल अधिकारी, साधन व्यक्ती, URC समन्वयक, गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (म.न.पा), जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा नोडल अधिकारी, अधिव्याख्याता, जेष्ठ अधिव्याख्याता, प्राचार्य (DIET) या सर्वांनी हा मोठा पल्ला गाठण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. या कार्यक्रमाचे महत्त्व पटवून देणारी अतिशय कल्पक अशी पोस्टर्स विद्यार्थी व शिक्षकांनी कमी वेळात खूप मेहनत घेऊन बनविली आहेत.

महाराष्ट्राच्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.)च्या शाळांमधून आलेल्या या पोस्टर्सचे, शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या (एसएमएफ) मुख्य कार्यालयाद्वारे पद्धतशीर संकलन करून त्याचे भव्य प्रदर्शनामध्ये रूपांतर करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्हा मेळाव्यामध्ये एक वेगळे प्रदर्शनही भरविले जाणार आहे. या प्रदर्शनाचे उदघाटन पहिल्या दिवशी म्हणजेच मेळावा सुरू होण्यापूर्वी करून नंतर दोन दिवस त्या त्या जिल्ह्यातील शिक्षणप्रेमी व्यक्ती तसेच इतर सर्वांनाच पाहण्यासाठी ते खुले ठेवले जाणार आहे. या प्रदर्शनातून स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.)चे शिक्षक करीत असलेल्या वैशिष्ठ्यपूर्ण कार्याची प्रत्यक्ष माहिती, त्या जिल्ह्यातील सर्व जनतेपर्यंत पोहोचू शकेल. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.) चे शिक्षक, शालेय शिक्षणात परिवर्तन घडविण्यात कशाप्रकारे सहभाग देत आहे याचा प्रत्ययही सर्वांना येऊ शकेल.

**मूल्यवर्धन कार्यक्रमाची संकल्पना :**

शालेय विद्यार्थी भविष्यात लोकशाहीचे जबाबदार, संवेदनशील व कर्तबगार नागरिक बनावेत म्हणून संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता पहिलीपासून रूजविणे. बालस्नेही व विद्यार्थीकेंद्रित पद्धतीने आनंददायी वातावरणामध्ये सहयोगी अध्ययन व ज्ञानरचनावादावर आधारित शिक्षण पद्धतीचा वापर करून, विद्यार्थ्यांमध्ये ही मूल्ये रूजविण्यासाठी, अभ्यासक्रमावर आधारित विविध कृती, वर्ग उपक्रम आणि शालेय स्तरावरील उपक्रम याद्वारे, सातत्याने आणि सुनियोजित रीतीने संधी उपलब्ध करून देणे, ही मूल्यवर्धन कार्यक्रमाची संकल्पना आहे.

**मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे झालेले / होणारे फायदे :**

मूल्यवर्धनमुळे मूल्यमापन अभ्यासातील सांख्यिकी माहितीवर आधारित निष्कर्षांशिवाय बरेच काही साध्य झाले. त्यातील ठळक मुद्दे खालीलप्रमाणे :

१. उपदेश, सुविचार, बोधकथा, धाक या पलीकडे जाऊन विद्यार्थी त्यांना आवडणाऱ्या कृती, खेळ,सहयोगी चर्चा यामधून मूल्यांविषयी विचारप्रवृत्त होऊन नैसर्गिक रीतीने हळू हळू मूल्ये स्वीकारतील, अशी पद्धत तयार झाली.

२. शालेय अभ्यासक्रमातील, भावनिक विकास आणि जबाबदार नागरिकत्व याद्दष्टीने महत्त्वाच्या असलेल्या मूल्य शिक्षणास योग्य ते गांभीर्य पुन्हा प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले.

३. प्रत्येक विद्यार्थ्याला वास्तविक प्रत्येक माणसालाच आवश्यक असणाऱ्या स्व-जाणीव आणि स्व-व्यवस्थापन या आवश्यक क्षमतांचा समावेश अध्ययन अध्यापनात झाला.
४. मास्टर ट्रेनर्स तयार करण्याची पद्धती आणि प्रशिक्षणात आणि संनियंत्रणात तंत्रज्ञान प्रभावी रीतीने वापरण्याची दखल शासनाने घेतली.
५. अनेक शिक्षक याची अंमलबजावणी मूल्यवर्धन कार्यक्रमाचे मर्म ओळखून करीत आहेत तर काही शिक्षक अपेक्षेपेक्षाही उच्च दर्जाची कामगिरी करीत आहेत. मुख्य म्हणजे अनेक शाळातून मुक्त अभिव्यक्तीला चालना देणारे सचेतन आनंददायी वातावरण निर्माण झाले.
६. या राज्यात मूल्यवर्धन पुढे घेऊन जाईल आणि इतर राज्यातही वापरता येईल असे तज्ञ मनुष्यबळ तयार झाले.
७. देशात सर्वात मोठा मूल्यशिक्षणाचा कार्यक्रम हाती घेऊन यशस्वीरितीने अंमलबजावणी करणारे राज्य म्हणून, तसेच राष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याचा आणि इतर राज्यांना सल्लागार म्हणून स्थान मिळण्याचा बहुमान महाराष्ट्राला मिळाला.
८. भावात्मक क्षेत्राशी निगडीत असल्याने, आव्हानात्मक असलेल्या मूल्यशिक्षणासाठी, संशोधन आणि अनुभवावर आधारित, संविधानातील मूल्यांवर आधारित असलेले त्याचप्रमाणे, शिक्षण क्षेत्रात व इतर राज्यांनाही मान्य होईल अशा शिक्षणपद्धतीचे प्रतिमान (model) तयार झाले.

**स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा) चे शिक्षक, प्रेरक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शाळा निरीक्षक (म.न.पा), विस्तार अधिकारी, तालुका नोडल अधिकारी, URC समन्वयक, गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (म.न.पा), जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा नोडल अधिकारी, साधन व्यक्ती, अधिव्याख्याता, जेष्ठ अधिव्याख्याता, प्राचार्य (DIET) या सर्वांना आवाहन:**

### अ) व्हिडीओ क्लिप्स बनविणे :

मूल्यवर्धन जिल्हा मेळाव्याच्या निमित्ताने वरील सर्वांना आवाहन करण्यात येत आहे की, मूल्यवर्धन संदर्भात खालील विषयांवर आपल्या मोबाईलमध्ये व्हिडिओ क्लिप्स बनवून त्या आपल्या तालुक्यातील एसएमएफ TC च्या मोबाईलवर Whats App द्वारे पोस्ट कराव्यात.

**व्हिडीओ क्लिप्ससाठीचे विषय :**

| अ.क्र. | विषय | कालावधी |
|---|---|---|
| १ | मूल्यवर्धन कार्यक्रम :माझे मत | २ मिनिटे |
| २ | मूल्यवर्धन कार्यक्रमातून शिक्षकांमधील परिवर्तन | २ मिनिटे |
| ३ | मूल्यवर्धन कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमधील परिवर्तन | २ मिनिटे |

| अ.क्र. | विषय | कालावधी |
|---|---|---|
| ४ | पालकांच्या दृष्टीकोनातून मूल्यवर्धन कार्यक्रम | २ मिनिटे |
| ५ | मूल्यवर्धन कार्यक्रमातून शालेय वातावरणामधील बदल | २ मिनिटे |
| ६ | “शाळांमध्ये मूल्याधिष्ठित व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी माझा कृती कार्यक्रम” शिक्षक/ मुख्याध्यापक/ केंद्रप्रमुख यांचा निर्धार- | ३ मिनिटे |

प्रत्येक विषयाच्या निवडक ३ म्हणजेच एकूण १८ व्हिडीओ क्लिप्स प्रातिनिधिक स्वरूपात जिल्हा मेळाव्यामध्ये दाखविल्या जातील व त्यावर चर्चा होईल. तसेच या क्लिप्स केंद्र शासनच्या PGI मध्ये समाविष्ट केल्या जातील.

हे सादरीकरण म्हणजे स्पर्धा नाही. ध्वनी आणि चित्र या दोन्ही दृष्टीने या क्लिप्स तांत्रिकदृष्ट्या योग्य दर्जाच्या होतील यासाठी तंत्रस्नेही शिक्षकांचे सहकार्य घेण्यात यावे. एसएमएफकडून याविषयी काही मार्गदर्शक सूचना पाठविल्या जातीलच तसेच तांत्रिक अडचणींविषयी मार्गदर्शनही करण्यात येईल.

### आ) अनुभव सादरीकरण :

स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा) चे शिक्षक, प्रेरक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शाळा निरीक्षक (म.न.पा), विस्तार अधिकारी, तालुका नोडल अधिकारी, URC समन्वयक, गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (म.न.पा), जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा नोडल अधिकारी, साधन व्यक्ती, अधिव्याख्याता, जेष्ठ अधिव्याख्याता, प्राचार्य (DIET)

यांना मूल्यवर्धन संदर्भात असेही खालीलप्रमाणे सहभागी होता येईल.

- वृत्तपत्रांमध्ये मूल्यवर्धन संबंधित लेख लिहून
- मूल्यवर्धन संबंधित लेखन/व्हिडीओज तयार करून ते Whats App द्वारे जास्तीत जास्त लोकांना पोस्ट पाठवून
- फेसबुक अथवा इतर सोशल माध्यमांद्वारे पोस्ट करून
- मूल्यवर्धन संबंधित माहिती/व्हिडीओज स्थानिक वाहिनीद्वारे (Channel) प्रसारित करून
- शाळेच्या मासिकामध्ये/अहवालामध्ये मूल्यवर्धन संबंधित लेखन करून
- वेगवेगळ्या प्रकारचे महत्त्वाचे राष्ट्रीय दिवस साजरे करणे, निबंध स्पर्धा घेणे, ECO क्लब बनविणे, युथ क्लब बनविणे, यशोगाथा सादर करणे इत्यादी बाबी करून त्या PGI मध्ये दाखल करून

या कार्यक्रमात स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.) मनापासून सहभागी होऊन शालेय शिक्षणात परिवर्तनाची भूमिका बजावत आहेत, ह्याचा जितका जास्तीत जास्त प्रचार, प्रसार आपल्या माध्यमातून होईल, तेवढा स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.) शाळांवरचा सर्वसामान्य जनतेचा विश्वास वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

## जिल्हा मेळावा फलनिष्पती :

स्थानिक स्वराज्य संस्था (जि.प., न.पा., म.न.पा.) शाळांचे हे यश, समाजासमोर ठेऊन भविष्य काळात संपूर्ण शालेय शिक्षणपद्धतीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता शिक्षकांमध्ये आहे. शिक्षक आणि पर्यवेक्षकीय यंत्रणा यांच्या परस्पर सहकार्याने आणि निर्धाराने या दिशेने परिवर्तनाची आश्वासक वाटचाल सुरु झाली आहे हे या जिल्हा मेळाव्यांतून अधोरेखित होणार आहे.

## श्री. शांतिलाल मुथ्था ह्यांचा महाराष्ट्र दौरा: जानेवारी ते मार्च २०२०
## मूल्यवर्धन जिल्हा मेळावे

| अनु. क्र. | तारीख | दिवस | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | ७ जानेवारी २०२० | मंगळवार | औरंगाबाद |
| २ | ८ जानेवारी २०२० | बुधवार | जालना |
| ३ | ९ जानेवारी २०२० | गुरुवार | नांदेड |
| ४ | १० जानेवारी २०२० | शुक्रवार | हिंगोली |
| ५ | १३ जानेवारी २०२० | सोमवार | बीड |
| ६ | १४ जानेवारी २०२० | मंगळवार | लातूर |
| ७ | १७ जानेवारी २०२० | शुक्रवार | परभणी |
| ८ | १८ जानेवारी २०२० | सनीवर | उस्मानाबाद |
| ९ | २१ जानेवारी २०२० | मंगळवार | सातारा |
| १० | २२ जानेवारी २०२० | बुधवार | सांगली |
| ११ | २३ जानेवारी २०२० | गुरुवार | कोल्हापूर |
| १२ | २४ जानेवारी २०२० | शुक्रवार | सोलापूर |
| १३ | ४ फेब्रुवारी २०२० | मंगळवार | धुळे |
| १४ | ५ फेब्रुवारी २०२० | बुधवार | जळगाव |
| १५ | ६ फेब्रुवारी २०२० | गुरुवार | नंदुरबार |
| १६ | ११ फेब्रुवारी २०२० | मंगळवार | ठाणे |
| १७ | १२ फेब्रुवारी २०२० | बुधवार | नाशिक |
| १८ | १३ फेब्रुवारी २०२० | गुरुवार | पालघर |

| अनु. क्र. | तारीख | दिवस | जिल्हा |
|---|---|---|---|
| १९ | २५ फेब्रुवारी २०२० | मंगळवार | वाशिम |
| २० | २६ फेब्रुवारी २०२० | बुधवार | बुलडाणा |
| २१ | २७ फेब्रुवारी २०२० | गुरुवार | अकोला |
| २२ | ४ मार्च २०२० | बुधवार | नागपूर |
| २३ | ५ मार्च २०२० | गुरुवार | भंडारा |
| २४ | ६ मार्च २०२० | शुक्रवार | गोंदिया |
| २५ | ७ मार्च २०२० | शनिवार | गडचिरोली |
| २६ | ११ मार्च २०२० | बुधवार | वर्धा |
| २७ | १२ मार्च २०२० | गुरुवार | चंद्रपूर |
| २८ | १३ मार्च २०२० | शुक्रवार | यवतमाळ |
| २९ | १४ मार्च २०२० | शनिवार | अमरावती |
| ३० | १८ मार्च २०२० | बुधवार | सिंधुदुर्ग |
| ३१ | १९ मार्च २०२० | गुरुवार | रत्नागिरी |
| ३२ | २० मार्च २०२० | शुक्रवार | अलिबाग (रायगड) |
| ३३ | २४ मार्च २०२० | मंगळवार | मुंबई |
| ३४ | २६ मार्च २०२० | गुरुवार | अहमदनगर |
| ३५ | ३१ मार्च २०२० | मंगळवार | पुणे |

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन
८ वा मजला, मुथ्था चेंबर्स -२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.फोन नं.: ०२० ६६०५ ०००० | info@mutthafoundation.org
www.mutthafoundation.org